# प्रेस नोट

दिनांक ः २८.०८.२०१५

## ना.चंद्रशेखर बावनकुळे, ऊर्जामंत्री यांनी घेतला कोराडी वीज प्रकल्पाचा आढावा

- राज्यभरातील महानिर्मितीच्या वीज केंद्र, वीज प्रकल्पांतील अंतर्गत व बाहय सुविधांचा विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश.
- सन २०१६ ते २०१८ करिता सांघिक सामाजिक जबाबदारी प्रस्तावाचे निर्देश
- कोराडी परिसर हरितमय करणार.

कोराडी ः महानिर्मितीच्या १९८० मेगावॅट वीज प्रकल्पाच्या विविध कामांचा आढावा व महानिर्मितीच्या राज्यभरातील वीज प्रकल्प, वीज केंद्र, कर्मचारी वसाहत व त्यांचेशी निगडीत विविध महत्त्वपूर्ण विषयांवर राज्याचे ऊर्जामंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी महानिर्मितीच्या बांधकाम कार्यालय, कोराडी सभागृहात बैठक घेतली. कोराडी येथील ३ X ६६० मेगावॅट क्षमतेचा हा वीज प्रकल्प महानिर्मितीचा पहिला महत्त्वाकांक्षी अश्या सुपर क्रिटीकल तंत्रज्ञानावर आधारीत वीज प्रकल्पाचे राष्ट्रार्पण आगामी काळात देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांचे शुभहस्ते करण्याचा मनोदय ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

बैठकीला महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक बिपीन श्रीमाळी, संचालक(प्रकल्प) चंद्रकांत थोटवे, संचालक(संचलन)विजय सिंह, कार्यकारी संचालक (प्रकल्प) अनिल नंदनवार, कार्यकारी संचालक(मानव संसाधन) मनोज रानडे प्रामुख्याने उपस्थित होते.

बैठकीत प्रामुख्याने केंद्र शासनाच्या पर्यावरणविषयक मुद्यांवर सविस्तर चर्चा, वीज प्रकल्प व वीज केंद्रांच्या सुरक्षा व्यवस्थेला अधिक बळकट करणे, पाण्याची बचत व पुनर्वापर करणे, न्यूनतम प्रदूषणाचे ध्येय,फ्लाय ॲश धोरण, प्रकल्पग्रस्त व स्थानिकांना रोजगार, आगामी दोन वर्षात सांघिक सामाजिक जबाबदारी सीएसआर) अंतर्गत गावनिहाय विकास निधीची तरतूद करणे, ग्रामपंचायत कर रचना नियमितीकरण, वृक्षारोपणाद्वारे परिसर हरितमय करणे ,कंत्राटी कामगारांना माफक किंमतीत घरे, महानिर्मितीच्या राज्यभरातील वीज प्रकल्प, वीज केंद्र अधिग्रहित परिसर व वसाहतीमध्ये कर्मचारी व कुटुंबियांकरिता आवश्यक सोयी सुविधा पुरविणे व त्याकरिता बांधा, वापरा, हस्तांतरीत करा तत्वावर आराखडा तयार करणे, आरोग्यसेवा अधिक चांगल्या करणे, रूग्णवाहिका, शववाहिका तातडीने उपलब्ध करणे, आगंतुकांसाठी वीज निर्मिती संग्रहालय इत्यादी महत्त्वपूर्ण विषयांवर मा.ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी समयबद्ध नियोजन करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. वास्तुतज्ञ निशिकांत भिवगडे यांनी कोराडी पर्यटन स्थळ तर सतीश साल्पेकर यांनी राखेचा उपयोग,धोरण व आवश्यक उपाययोजना हयाबाबत संगणकीय सादरीकरण दिले.

याप्रसंगी परिसरातील लोकप्रतिनिधींनी स्थानिक प्रश्नांविषयी मंत्री महोदयांना अवगत केले.हयामध्ये नगराध्यक्ष नगरपरिषद महादुला सौ.कांचन कुथे, राजेश रंगारी उपाध्यक्ष नगरपरिषद महादुला, सरपंच ग्रामपंचायत कवठा, लोणखैरी,घोगली,खापा पाटण,बिना, गुमथी,भिलगांव,वारेगाव, सुरादेवी प्रामुख्याने उपस्थित होते.

बैठकीला मुख्य अभियंता कोराडी वीज केंद्र साहेबराव विजयकर,मुख्य अभियंता(प्रकल्प) कोराडी उमाकांत निखारे,मुख्य अभियंता(बांधकाम) अरूण सोनकुसळे,मुख्य अभियंता खापरखेडा वीज केंद्र सिताराम जाधव, मुख्य अभियंता (पीएमजी)संजय मारूडकर,मुख्य अभियंता(स्थापत्य-३)प्रमोद नाफडे, मुख्य अभियंता(स्थापत्य-२) अ.शौ.देवतारे, उप मुख्य अभियंता(स्थापत्य)धैर्यधर खोब्रागडे, उप मुख्य अभियंता पी.एम.निखारे,प्रकाश शर्मा,उप जिल्हाधिकारी , विवेक बोंदरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद. हरिष धार्मिक उप विभागीय अधिकारी, व्ही.बी.चव्हाण तहसिलदार कामठी,मुख्याधिकारी न.प.महादुला तसेच संबंधित ग्रामविकास अधिकारी,ग्रामसेवक उपस्थित होते.